● जालना ● वर्ष ६ वे ● अंक ४४ वा ● किमंत २ रुपये ● पाने ४




yuva.aadarsh@gmail.com
RNI: MAHMAR/2019/78282

# युवा आदर्श

https://www.facebook.com/yuvaaadarshnews/

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो. ८३९००९८८८६ मंगळवार, दि ३ सप्टेंबर २०२४ https://yuvaadarsh.com

## सरकार ढगफुटीग्रस्त शेतकऱ्यांच्या पाठीशी

### आ. लोणीकर यांनी दिला नुकसानग्रस्तांना धीर; नुकसानग्रस्त भागाची केली पाहणी

**परतूर । प्रतिनिधी -** मतदार संघातील जवळपास सर्वच्या सर्वच मंडळात ६५ मिलिमीटर पेक्षा अधिकचा पाऊस झालेला असून काही मंडळात तर अक्षरशा १८०- २०० मिलिमीटर पर्यंत पाऊस झाल्याने अनेक गावातील घरांमध्ये पाणी शिरले तर शेतकऱ्यांच्या शेतातील उभी पिके वाहून गेली त्यामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असून या नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शासनास अहवाल सादर करा असे निर्देश आमदार बबनराव लोणीकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह प्रशासनातील सर्वच यंत्रणांना दिले आहेत

काल दुपारपासूनच माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर हे विविध प्रशासकीय यंत्रणांच्या संपर्कात राहून वेळोवेळी सूचना देत होते या पार्श्वभूमीवर आज माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर यांनी मंठा तालुक्यातील

मंठा शहरातील सुगंधा





नगर, पाटोदा, हेलसवाडी लिंबेवडगाव पांगरी खुर्द खोराड सावंगी आदी गावात जाऊन नुकसान ग्रस्त भागाची पाहणी केली

या पाहणी दौऱ्या दरम्यान आमदार लोणीकरांनी थेट नुकसानग्रस्तांच्या घरी जाऊन पाहणी केली

यावेळी बोलताना आमदार बबनराव लोणीकर यांनी, मतदार संघातील सर्वच भागात सरासरीपेक्षा खूप अधिकचा पाऊस झाला असून या पावसामुळे प्रचंड प्रमाणात नुकसान झाले असल्याचे सांगतानाच अनेक गावातील घरांची पडझड झाली आहे शाळा खोल्या नेस्तनाबूत झाले आहेत, घरातील अन्नधान्य अक्षरशा पाण्यात वाहून गेले आहे तसेच शेतीचेही प्रचंड नुकसान झाले असून अनेकांच्या शेतातील उभी पिके आडवी झाली असल्याचे सांगितले

पुढे बोलताना आमदार बबनराव लोणीकर म्हणाले, पांगरी बुद्रुक गावाला पाण्याचा वेढा पडला होता तर पाटोदा येथील प्रवाहा मुळे अडकले होते यासंदर्भात आपण जिल्हाधिकारी महोदय पोलीस अधीक्षकांशी बोलून तात्काळ एन डी आर एफ च्या टीमला प्राचार्य करत या १५ लोकांना सुखरूप पान २ वर

आपत्ती निवारणासाठी जिल्हा प्रशासन सज्ज

## जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरु नये, दक्षता बाळगावी - जिल्हाधिकारी

**जालना । प्रतिनिधी -** मान्सून कालावधीत आपत्ती निवारणासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. एखाद्या ठिकाणी आपत्ती उद्भवल्यास तेथील नागरिकांपर्यंत प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी लवकरात लवकर पोहोचून मदत करतील, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्तीचा पाऊस झालेला आहे. आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून आपत्तीचा सामना करण्यासाठीची साधनसामुग्री सज्ज ठेवावी अशा सुचनाही उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना दिलेल्या आहेत. तसेच उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांनी आपले मुख्यालय सोडू नये. आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरुन जावू नये तर दक्षता बाळगावी.

शेती किंवा मालमत्ता नुकसानीचे पंचनामे उपविभागिय अधिकारी आणि तहसीलदार यांनी निकषानूसार करावेत, अशा सूचना ही जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्या आहेत.

भोकरदन शहरातील केळना नदीला पूर आल्याने आलापूर परिसरातील पुल वाहतुकीसाठी बंद केला आहे. नदीलगतच्या ४घरातील २३ लोकांसह त्यांचे नातेवाईक स्थलांतरित झाले आहे. घनसावंगी तालुक्यात बाणेगाव येथे शिवाजी विठ्ठल शिंदे गोदावरी नदीत बुडून मयत झाले आहेत. अंतरवाली टेंभी नजीक पांढरे वस्तीवरील पन्नास जणांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. पाडोळी बुद्रुक येथे पुरात सापडलेले तीन जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. भुतेगाव ते करडगाव मधील पूल वाहून गेला तर चित्र वडगाव येथील एक पूल वाहून गेला. मयत जनावरांमध्ये पिंपरखेड येथील २० कोंबड्या, पानेवाडी ४ शेळ्या, तीर्थपुरी २६ येथील कोंबड्या, गुरु पिंपरी येथील ६ शेळ्या, शिंदे वडगाव येथील २ बैल, १ गाय व ५शेळ्या तसेच बहिरेगाव एक गाय यांचा समावेश आहे.

दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी जालना जिल्ह्यात एकूण १०७.३ मि.मी. पाऊस झाला आहे. एकूण २९ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असल्याची नोंद झालेली आहे. जालना तालुका- जालना ग्रामीण १५०.५ मि.मी. , नेर १२०.३ मि.मी., विरेगांव १३७.५ मि.मी., पाचन वडगांव ८७.३ मि.मी. , बदनापूर तालुका- शेलगांव ७१.00 मि.मी. , दाभाडी ८१.५ मि.मी., भोकरदन तालुका- भोकरदन ८७.८ मि.मी , पान २ वर

## जाफराबादच्या पूर्णा नदीला यंदाच्या पावसाळ्यात प्रथमच पूर

**जाफराबाद । प्रतिनिधी -** पूर्णा नदीचा सर्वात मोठा पात्र या तालुक्यातून जाते. उन्हाळ्यानंतर कोरड्या पडलेल्या या नदीला, पावसाळ्याचे पहिल्या तीन महिन्यानंतर प्रथमच पूर्णा नदीला पूर आलेला असून, पूर्णा नदीच्या वरती असलेल्या केदारखेडा, प्रेरणा नदी धामणा नदी या नद्यांना व छोट्या छोट्या नद्यांना पूर आल्यामुळे पूर्णा नदी दुधडी भरून वाहत आहे. पूर्णा नदीचे सर्व पाणी खडकपूर्णा धरणात जात असल्याने. तसेच खडकपूर्णा धरण भरल्यानंतर बॅकवॉटरचे पाणी जाफराबाद तालुक्यातील शेतकऱ्यांना दिसते. अनेक दिवसाच्या पाणी प्रश्न यातून मिटणार पान २ वर



## परतूर तालुक्यात पावसामुळे जनजीवन विस्कळित

**परतूर । प्रतिनिधी -** परतुर तालुक्यामध्ये ठिकठिकाणी दि.१ सप्टेंबरच्या सकाळी सहा ते सव्वा सहा दरम्यान पावसाला सुरुवात झाली होती. परतूर तालुक्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले आहे. मुसळधार पावसामुळे परतूर शहर व गाव भागात पाणीच पाणी झाले होते.काही भागात घरामध्ये पाणी गेल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले. आंबेडकर नगर



जवळ असलेल्या लेंडी पुलावरून पाणी वाहू लागल्याने व गावातील नालीनाले भरून पाणी सर्व झपाट्याने आंबेडकर नगर भागामध्ये शिरले पाण्याचा प्रवाह झपाट्याने वाढत होता यामुळे पाणी घरात शिरले होते. लोकांची नुकसान भरपूर झालेली दिसत आहे. व रजिस्ट्री ऑफिसमध्ये पाणी पान २ वर

## युवा आदर्श

### नामा ...

**नामा करे विठूभक्ती**
**संगे सांभाळे संसार**
**गाथेतून अभंगवाणी**
**सांगे जीवनाचे सार**
**सतत चालले भ्रमण**
**साथी निघाले विचार**
**जन जागृती करता**
**भक्ती मार्गाचा प्रसार**
**जोडे माणूस माणसा**
**घेता अभंगा आधार**
**संत जना भगिनीचा**
**केला सर्वस्वी उध्दार**
**विठू खाई नामा घास**
**दिली तृप्तीची ढेकर**
**श्वाना देतो तूप वाटी**
**नको कोरडी भाकर**
**भाव वस्त्र दिले जगा**
**नामाशिंपी कलाकार**
**रे राष्ट्रीय एकात्मतेचा**
**देई समाजा आकार**
**गुरू विसोबा खेचर**
**जळून जाई अहंकार**
**संत मांदियाळी मध्ये**
**नवा सुवर्ण अलंकार**
**नामा पहिली पायरी**
**पहावे पंढरी शिखर**
**संत सांप्रदायी मोती**
**उज्वल भक्तीचे मखर**

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

## ग्रामीण भागात व्यापारी संघटना मजबूत करणार - आदेशपालसिंग छाबडा

### मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सची नूतन संचालक मंडळाची बैठक संपन्न



**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी -** मराठवाडा चेंबर ऑफ ट्रेड अँड कॉमर्सच्या नूतन संचालक मंडळाची पहिली बैठक छत्रपती संभाजीनगर येथे रविवार (दि १) रोजी चेंबरचे अध्यक्ष आदेशपालसिंग छाबडा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीत व्यापाऱ्यांच्या विविध प्रश्नांवर चर्चा करण्यात आली. यावेळी तालुका व गाव पातळीपर्यंत व्यापारी संघटना मजबूत करण्यास प्राधान्य देण्याचे सर्व संमतीने ठराव पारित करण्यात आला.

सरकार दरबारी व्यापाऱ्यांच्या समस्यांचे निराकरण करायचे असल्यास व्यापारी संघटना ग्रामीण, तालुका स्तरावर मजबूत असणे आवश्यक आहे. त्यासाठी मराठवाडा चेंबरचे संचालक मंडळ पान २ वर

## मनपा हद्दीमध्ये शहिद भगतसिंह स्मारक उभारण्याची मागणी



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मनपा हद्दीमध्ये शहिद भगतसिंह स्मारक उभारण्यासाठी प्रशासनाच्या वतीने तात्काळ विशेष प्रयन करण्यात यावे अशी मागणी सोमवार (दि २) रोजी सरदार शहीद भगतसिंग मित्र मंडळ,सिगलीकर समाजाच्या वतीने मनपा आयुक्तांकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले की,मनपा शहर जालनाच्या वतीने अधिकृतरित्या कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी अद्यापपर्यंत जालना शहरामध्ये पान २ वर

## टेंभुर्णी ग्रामपंचायतच्यावतीने पोळ्यांच्या मानकऱ्यांचा सत्कार



**दत्ता देशमुख**

**टेंभुर्णी -** येथील पोळा वैशिष्ट्यपूर्ण असतो. दरवर्षी या पोळ्याच्या मानकऱ्यांचा सत्कार केला जातो. यावर्षी सुद्धा पोळ्याच्या मानकर यांचा सत्कार करण्यात आला. पोळ्याचे मानकरी हौसराव देशमुख, दिनकर देवराव देशमुख, दुर्गादास हरिभाऊ देशमुख, गबाजी सखाराम जाधव, सुरेश हरिभाऊ आवटी,अशोक हौसेराव देशमुख, शंकर भागवत, आदींचा ग्रामपंचायत तर्फे सत्कार करण्यात आला. टेंभुर्णीचा पंचक्रोशी मध्ये पोळा नावाजलेला असून टेंभुर्णीच्या दोन वेशी असून, माळी गल्लीतील वेशी मध्ये सुद्धा पोळा भरल्या जातो. या पोळ्याच्या मानकर यांचा सत्कार टेंभुर्णी ग्रामपंचायत च्या वतीने चार वर्षापासून केला जातो. पूर्वजापार चालत आलेल्या संस्कृतीचा पोळा हा सण अतिशय वैशिष्ट्यपूर्ण असून मानकऱ्यांच्या पोळ्यांची पूजा व आधी होते. त्यांच्या बैलांची पूजा झाल्यानंतर सर्व शेतकरी याविषयी मधून आपले बैल वेशी मधून येतात. सर्व मानकर यांची पहिले एकत्र होऊन. प्रत्येक मानकरांच्या घरी त्याची पूजा अर्चा केल्या जाते. नंतर सर्व बैलांना देवाधिकांना दर्शनासाठी नेल्या जाते. तसेच गावातील इतर शेतकऱ्यांची बैल ही प्रत्येक घरी जाऊन त्याची पूजा केल्या जाते आणि वाजत गाजत त्यांची मिरवणूक काढल्या जाते. पोळ्या निमित्ताने दरवर्षी प्रमाणे ग्रामपंचायत व सरपंच गौतम म्हस्के यांच्या वतीने सत्कार करण्यात आला यावेळी उपसरपंच शिवाजी मुळे, हौसेराव देशमुख, दिनकर देशमुख, शंकर भागवत, सुरेश आवटी, गबाजी, रामराम जमधडे, दिपक देशमुख, कल्याण देशमुख, बाळु देशमुख, नारायण देशमाने, विक्रम उकांडे, दिगंबर भिसे या मान्यवरांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला.

## सिद्धेश्वर महादेव मंदिर परिसरात पेव्हर ब्लॉक कामाचा शुभारंभ



**जालना । प्रतिनिधी** - शिवसेना उपनेते तथा माजी राज्यमंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या प्रयत्नातून जालना महानगर पालिका क्षेत्रातील पायाभूत सोयीसुविधा व सुशोभीकरण विकास कामासाठी विशेष तरतुद योजनेअंतर्गत कचेरी रोड जुना जालना येथील सिद्धेश्वर महादेव मंदिर परिसरात पेवर ब्लॉक बसवण्यासाठी निधी उपलब्ध झाला असून या कामाचा शुभारंभ अर्जुनराव खोतकर यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी जिल्हा संपर्कप्रमुख पंडितराव भुतेकर, जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, उपजिल्हाप्रमुख गणेश सुपारकर, माजी नगरसेवक लक्ष्मण सुपारकर आदींसह मोठ्या संख्येने महिला, कार्यकर्ते व नागरिकांची उपस्थिती होती.

## संपादकीय

### विद्यार्थ्यांच्या चिंताजनक आत्महत्या

भारतातील विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्महत्यांबाबत एक अहवाल नुकताच प्रसिद्ध झाला. मागील आठवड्यात नॅशनल क्राईम ब्युरोच्या डेटावर आधारित स्टुडंट्स सुसाईड : अन अपेडेमिक स्वीपिंग इंडिया नावाचा अहवाल वार्षिक आयसी ३ परिषद आणि आणि एक्स्पो २०२४ मध्ये जाहीर करण्यात आला. हा अहवाल अतिशय धक्कादायक आहे कारण या अहवालात आपल्या देशातील आत्महत्यांचे वास्तव मांडण्यात आले आहे. या अहवालानुसार देशातील आत्महत्यांच्या दरात कमालीची वाढ झाली आहे. यावर्षी देशभरात ७० हजारांहून अधिक नागरिकांनी आत्महत्या केल्या असून यात सर्वात जास्त आत्म हत्या पुरोगामी महाराष्ट्रात झाल्या आहेत. त्यातही धक्कादायक आणि चिंताजनक बाब म्हणजे यात सर्वाधिक आत्महत्या विद्यार्थ्यांच्या आहेत. त्यातही पुरोगामी महाराष्ट्राचा पहिला क्रमांक लागतो. महाराष्ट्रात सर्वाधिक विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या आहेत. महाराष्ट्रानंतर तामिळनाडू, मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, झारखंड या राज्याचा क्रमांक लागतो. विद्यार्थी आत्म हत्येत महाराष्ट्र अव्वल क्रमांकावर असणे ही भूषणावह बाब नसून शिव, फुले, शाहू, आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्राला खाली मान घालायला लावणारी ही बाब आहे. कणखर देशा राकट देशा दगडांच्या देशा असा महाराष्ट्राचा उल्लेख होतो त्यात दुर्दैवाने आत्महत्यांच्या देशा असेही नमूद करावे लागत आहे. आज जगातील सर्वाधिक लोकसंख्या भारतात आहे आणि यात सर्वात जास्त तरुणांची संख्या आहे. भारतात तरुणांची संख्या जवळपास ६० टक्के इतकी आहे. इतके तरुण जगातील कोणत्याच देशात नाहीत म्हणूनच भारताकडे आगामी महासत्ता म्हणून पहिले जाते. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ ए पी जे अब्दुल कलाम यांचा तर तरुणांवर खूप विश्वास होता. तरुणांच्या जोरावरच भारत जागतिक महासत्ता बनेल असा विश्वास त्यांना होता. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता बनण्याची स्वप्ने पाहत आहोत तोच तरुण जर असा अकाली मृत्यूला कवटाळू लागला तर देशाच्या भविष्यावरच प्रश्न चिन्ह निर्माण होऊ शकते म्हणूनच विद्यार्थ्यांच्या या आत्महत्या राज्यकर्त्यांनी गांभीर्याने घ्याव्यात आणि आत्महत्या कमी रोखण्यासाठी ठोस धोरण आखायला हवे. अर्थात विद्यार्थी आत्महत्या का करतात याचाही विचार व्हायला हवा. विद्यार्थ्यांच्या वाढत्या आत्म हत्यांमागे अनेक करणे आहेत त्यातील प्रमुख कारण म्हणजे पालकांच्या मुलांकडून अनाठायी अपेक्षा. शिक्षणातील भयंकर स्पर्धा, गुणांची जीवघेणी चढाओढ, शिक्षण घेऊनही रोजगार न मिळणे, प्रेमभंग या आणि अशा अनेक कारणांमुळे तरुण अकाली मृत्यूला कवटाळीत आहेत. समाज माध्यमांचा वाढता प्रभाव हे देखील विद्यार्थी आत्महत्यांच्या कारणांपैकी महत्वाचे कारण आहे. समाज माध्यमांच्या आहारी गेल्यामुळे मुले खूप भावनिक झाली आहे. आपल्या भावनांना आवर न घालता आल्याने मुले आत्महत्येचा मार्ग स्वीकारीत आहेत. ब्लू व्हेल, पोकोमन यासारख्या हिंसक गेम्समुळे देखील अनेक मुलांनी आत्महत्या केल्याचे समोर आले आहे. विद्यार्थ्यांना पालकांकडून हल्ली अनेक गोष्टी सहज उपलब्ध होऊ लागल्या आहेत त्यामुळे एखादी गोष्ट जेंव्हा मिळत नाही तेंव्हा ती मिळावी यासाठी विद्यार्थी अट्टाहास करतात मग त्यांना त्यात अप्याश आले की ते मृत्यूला कवटाळतात म्हणून पालकांनी मुलांना नकार पचवायला शिकवले पाहिजे. पालकांनी मुलांवर अपेक्षांचं ओझेही लादू नये. विद्यार्थी आत्महत्या म्हणजे देशाची मोठी हानी त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखण्याची जबाबदारी केवळ पालकांचीच आहे असे नाही तर शाळा, कॉलेज, शिक्षक, समाज आणि शासनाचीही आहे. या सर्व घटकांनी एकत्र येऊन विद्यार्थ्यांच्या आत्महत्या रोखणयासाठी प्रयत्न करायला हवेत.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# रोगराई, इडा-पिडा, ढेकूण-मोंगसा घेऊन जा गेSSS... मारबत!

पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी लहान मुले आजही लाकडाचा किंवा मातीचा लहान नंदीबैल सजवून त्याची मिरवणूक काढतात. नंदीबैलांना रंगवणे, तोरण-फुलांनी सजवणे, त्यांना आकर्षक बनवणे ही कामे सणाच्या कितीतरी दिवस आधीपासूनच करण्यासाठी त्यांची लगबग सुरू असते. ज्या दिवशी तान्हापोळा असतो त्या दिवशी ही बच्चेकंपनी आपापले नंदीबैल घेऊन शेजारी तसेच ओळखीच्या लोकांच्या घरी जातात. तेथे पोळा मागितला जातो. मग त्या नंदीबैलाला व नंदीबैलधारकाला ते ओळखीतले कुटुंब ओवाळून खाऊ आणि पैसे देतात. तोंड गोड करतात. काही ठिकाणी या लाकडी नंदीबैलांचा भव्यदिव्य मेळावा भरतो. तसेच अनेक ठिकाणी या लहान मुलांसाठी नंदीबैलांची सजावट आणि स्पर्धा आयोजित करण्यात येतात. पुढे अवश्य वाचा श्री एन. के. कुमार गुरूजी यांचा हा महत्वपूर्ण लेख...

एक कृषिप्रधान देश आहे. महाराष्ट्रात व त्यातल्या त्यात विदर्भात पोळा हा एक शेतकऱ्यांचा मोठा सण आहे. त्या दिवशी बैलांना कामकाजापासून सुट्टी असते. त्या दिवशी बैलांना न्हाऊ-माखू घालतात. त्यांना गोड पुरणपोळीचे जेवण घालतात, त्यांना सजवतात व मिरवतात. त्या दिवशी त्यांची घरोघरी पूजा होते. लहान मुले मोठे बैल नेऊ शकत नाहीत. ते त्यांना आवरू पण शकत नाहीत. म्हणून त्यांच्या हौस-मजेसाठी तान्हापोळा साजरा करण्यात येतो. त्या दिवशी लहान मुले माती किंवा लाकडापासून तयार केलेला नंदीबैल घेऊन खऱ्या बैलाप्रमाणेच या नंदीबैलांचा तान्हापोळा साजरा करतात. नागपूरकर भोसल्यांच्या शासनकाळात हा सण सुरू झाला. विदर्भात बहुधा सर्व ठिकाणी हा सण साजरा होतो. विदर्भात पोळ्याचा सण उत्साही वातावरणात व मोठ्या प्रमाणात साजरा करण्यात येतो. येथील अनेक ठिकाणी बैलपोळा या सणाच्या दुसऱ्या दिवशी साजरा होणारा सण म्हणजे तान्हापोळा होय. हा सण म्हणजे बालगोपाळांचा सण- बालोत्सव असतो. कारण लहान मुले मोठे बैल नेऊ शकत नाही किंवा व्यवस्थित सांभाळू शकत नाही. बैलांना आवरणे त्यांना कठीण जाते. तान्हापोळा हा सण साजरा करण्यामागेही इतिहास आहे-

सन १८०६च्या काळात नागपुरात रघुजी राजे भोसले द्वितीय हे येऊ घातलेल्या पोळ्याची तयारी करत होते. शेती आणि शेतकरी हा त्यांचा अत्यंत जिव्हाळ्याचा विषय होता. शेतीकडे ते एक व्यवसाय म्हणून नव्हे तर परंपरा आणि संस्कृती म्हणून पाहत होते. ही परंपरा नव्या पिढीने देखील जोपासली पाहिजे, असा त्यांचा आग्रह असायचा. यातूनच तान्हापोळा या सणाचा जन्म झाला. रघुजी राजे भोसले द्वितीय हे दूरदृष्टी असलेले लोकांचे नेते असल्यामुळे त्यांनी नवीन पिढ्यांना शेती व शेतीशी जुळलेले बैल यांच्याप्रती आस्था व रुची वाढावी, म्हणून तान्हापोळा सुरू केला.

श्रावण अमावस्येला साजरा होणाऱ्या मोठ्या बैलांच्या पोळ्यात लहान मुलांचा जास्त संबंध येत नाही. ते फक्त बघतच असतात. यातून महाराजांना एक कल्पना सुचली आणि ती त्यांनी लगेच अमलात आणली. लहान मुलांना मोठा व खराखुरा बैल सांभाळणे कठीण असते म्हणून त्यांनी लाकडाचा बैल तयार करून घेतला. या लाकडी बैलांना चाके लावली. मोठ्या बैलांचा जसा पोळा सण साजरा करतात, तसाच हा उत्सव सुरू केला. बैलांची वाजतगाजत मिरवणूक काढली. मोठ्या पोळ्यातील सर्व गोष्टी या तान्ह्यापोळ्यात सुरू केल्यात. बैलाची पूजा झाल्यावर पोळा फुटला, अशी दवंडी दिली जायची. हा सण लहान मुलांसाठी असल्यामुळे महाराज त्या मुलांना मिठाई व इतर भेटवस्तू देत. भोसले चौफेर असले तरी तान्हापोळा नागपूरकर भोसलेच साजरा करतात. पशुप्रेमाची पूर्वापार परंपरा विद्यमान मुधोजी राजेंनी जपली. त्यांच्या संग्रहात आजही उमदे घोडे, राजहंस, विविध पक्षी व प्राणी आहेत.

नागपुरात तर पोळ्याच्या दुसऱ्या दिवशी मारबत आणि बडग्याचा उत्सव असतो. समाजातील वाईट चालीरीती आणि रोगराई दूर करण्याचे साकडे मारबतीला घालण्यात येते. या उत्सवात राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय मुद्दे आणि स्थानिक समस्या यावर भाष्य करणारे फलक असतात. ही परंपरा सन १८८१पासून सुरु झाली. मारबत आणि बडगा हा जगातील एकमेव असा मिरवणूक प्रकार फक्त नागपुरातच आहे. आता तर काळी मारबत व पिवळी मारबत तयार करतात आणि त्यांची मोठ्या धुमधडाक्यात मिरवणूक काढतात. विदर्भात नागपूर आणि आसपासच्या सर्व भागात तान्हापोळा साजरा केला जातो. बैलपोळा आणि तान्हापोळा असे दोन सण दोन दिवस साजरे केले जातात. शेतीची आणि पशुधनाची असलेली बांधिलकी व कृतज्ञता जपण्याचा प्रयत्न केला जातो. परंपरा आणि संस्कृती जपली जाते. म्हणूनच विदर्भातील पोळा सण वैशिष्ट्यपूर्ण आणि आगळावेगळा ठरला आहे. तान्हापोळा निमित्ताने सर्वांना हार्दिक हार्दिक शुभेच्छा !! इस पिडा, ढेकूण, मोंगसा घेऊन जा गेSSS.... मारबत !

**श्री एन. के. कुमार**
**रामनगर- गडचिरोली, मो. ७७७५०४१०८६.**

### मंठा तालुक्यातील नुकसानग्रस्त भागांची पाहणी

# तात्काळ मदत मिळवुन देण्यासाठी प्रयत्न करणार- उदयसिंह बोराडे

**मंठा । प्रतिनिधी -** मंठा आणि परतुर तालुक्यासह नेर-सेवली भागात आज रविवारी (ता. १) सकाळपासुनच सुरु असलेल्या अतिवृष्टीमुळे शेती पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन आर्थिक मदत तात्काळ मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे मंठा शिव- सेनेचे तालुकाप्रमुख उदयसिंह बोराडे यांनी नुकसानग्रस्त भागांची पाहणी करतांना ते बोलत होते. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतल्यानंतर उदयसिंह बोराडे यांनी तहसीलदार व जिल्हाधिकारी यांच्याशी बोलत होते. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती घेतल्यानंतर उदयसिंह बोराडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधुन त्यांना नुकसानीची माहिती दिली. शनिवारी (ता. ३१) रात्रीपासुनच अतिवृष्टी सुरु असून, या भागात पावसाने थैमान घातले आहे. या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे कापुस, सोयाबीन, तुर पिकांसह फळबागांचेही



मोठ्या प्रमाणाव नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आ लेला घास या अतिवृष्टीने हिरावुन घेतला आहे. त्यामुळे झालेल्या नुकसानीचे तात्काळ प्रशासनाने पंचनामे करुन आपला अहवाल शासनाकडे पाठवावा व शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवुन द्यावी, अशी मागणी बोराडे यांनी केली आहे.



**अंजुमन खैरुल ईमदादने आयोजित केलेल्या कार्यक्रमात प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्राचे चेअरमन इलियास अब्दुलमजीद खान यांचा सत्कार करताना ऑल इंडिया मेमन जमातचे अध्यक्ष इक्बाल मेमन आणि मुंबई कॉंग्रेसचे प्रवक्ता निजामोद्दिन राईन आदी छायाचित्रात दिसत आहे.**

# नेत्याने नेत्यांना जोडे का मारले ?

मालवण राजकोटचा छत्रपती शिवाजी महाराज पुतळा कोसळला त्यामागे बेजाजाबदार रीतीने केलेले ढिसाळ काम,आर्थिक भ्रष्टाचार,विधान सभा निवडणूक डोळ्यासमोर ठेवून केलेलं राजकीय षडयंत्र हे कारणीभूत आहे.आराध्य दैवतांच्या बाबतीत घडलेली दुःखद घटना देश विदेशात त्याचे पडसाद उमटले.महाराष्ट्राची नाचक्की झाली.महाराष्ट्र सरकार त्याला दोषी आहेत हे उघड सत्य आहे.हि क्षम्य गोष्ट नाही. महाविकास आघाडीचे जोडे मारो आंदोलन पोलिसांची परवानगी नसताना यशस्वी झाले.कुठेही ताण तणाव निर्माण झाला नाही.कारण प्रसंगच तितुका संवेदनशील होता.जोडे मारो आंदोलनात वयोवृद्ध जेष्ठ नेते शरद पवार व छत्रपती शाहू महाराज उपस्थित राहिल्याने महाराष्ट्र सरकारने सामंजस्याची भूमिका घेऊन थोडा का होईना समंजसपणा दाखवला हे चांगले झाले.याउलट जर का उद्धव बाळासाहेब ठाकरे यांनी स्वतंत्र मोर्चा काढला असता तर कदाचित वातावरण चिघळले असते किव्वा मुद्दाम चिघळवले असते आणि त्याला वेगळी राजकीय षडयंत्राची कलाटणी मिळाली असती.

अघटित घटना घडली कि,मोर्च्यात नेत्यांच्या छायाचित्र पोस्टरवर काळे फासणे जोडे मारणे हे पवित्र काम बहुतांश पक्षाचे कार्यकर्ते करत असतात.कोणत्याही राजकीय नेत्याने दुसऱ्या नेत्यांना आतापर्यंत कधी काळे फसले किव्वा जोडे मारले असे दृश्य दिसले नाही.उद्धव ठाकरे यांनी मात्र उपमुख्यमंत्री फडणवीस व अजित पवार याना सौम्य जोडे मारले,तर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पोस्टरवर मनसोक्त जोडे मारताना दिसत होते.ह्या,मागचे कारण कदाचित दिवंगत नेते आर आर पाटील यांनी शिंदे हे धोकेबाज आहेत ते केव्हाही तुम्हाला राजकीय दगाफटका करू शकतात पण उद्धव ठाकरे यांनी शिंदे यांच्यावर ते कडवट शिवसैनिक आहेत आणि ते दगाफटका करू शकणार नाहीत हा अति विश्वास दाखवला शिंदे संदर्भात तीच बाब शरद पवार साहेबाना माहित असल्यामुळे त्यांनी उद्धव ठाकरे यांनी शिंदे ऐवजी महाविकास आघाडीचे नेतृत्व उद्धव यांनी करावे म्हणून उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. शिंदे यांनी शिवसेना फोडली.उद्धव ठाकरे याना राजकीय दगाफटका करून नामुष्कीने सत्तेतून पायउतार व्हावे लागले. शिंदे यांनी पक्ष आणि चिन्ह ह्यावर हक्क सांगून उद्धव ठाकरे याना वेदना दिल्या.शिवसेना पदाधिकारी,नेते फोडण्याचे षडयंत्र अव्याहत सुरु ठेवले.राज्याची आर्थिक स्थिती अडचणीची असून सुद्धा शिंदे यांनी मतांची बेगमी व्हावी म्हणून वेगवेगळ्या योजना राबवून उद्या सत्तेत येण्याचा मार्ग चोखाळला छत्रपती शिवाजी महाराज ह्यांच्या नावाचा वापर करीत पुन्हा मुख्यमंत्री होण्यासाठी मोदींना खुश करण्यासाठी पुतळा अनावरणाचा घाट घातला तो अंगाशी आला असेच म्हणावे लागेल त्यात त्यांची हाराकिरी झाली.ह्या सर्व बाबी नक्कीच धक्कादायक आहे.शिवप्रेमींच्या भावना दुखल्यामुळे सय्यमीचे वर्तन झुगारून उद्धव ठाकरे यांनी आपला सर्व राग शिंदे यांच्या पोस्टरवर जोडे मारून काढला.परंतु उद्धव ठाकरे यांची हि कृती समर्थनीय नाही.उद्या पलटवार झाला तर राज्यातील वातावरण गढूळ नव्हे तर रक्तलांछित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.महायुती सरकारच्या बालिश वर्तनाने असे प्रसंग उभे राहिले.झालेल्या घटनेचा बोध घेऊन आततायी पाऊल उचलू नये.सुडाचे राजकारण करु नये.पोलीस प्रशासनाने नागरिकांचे हित पाहता भावी धोके लक्षात घेऊन सामाजिक परिस्थिती बिघडू नये म्हणून सर्व राजकीय नेत्यांना वेळीच समज द्यावी.

**- यशवंत चव्हाण सीबीडी बेलापूर (नवी मुंबई )**

## पान १ वरुन

### सरकार ढगफुटीग्रस्त...

बाहेर काढण्याची आमदार लोणीकर यांनी नमूद केले

पुढे ते म्हणाले की झालेले नुकसान हे प्रचंड असून यामुळे शासन स्तरावरून तात्काळ मदत मिळावी यासाठी आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस अजित दादा पवार, यांच्याशी पत्रव्यवहार केला असून नुकसानग्रस्तांना तात्काळ मिळत मिळावी या साठी विनंती केली असून भ्रमणध्वनीवरून त्यांच्याशी माझा संपर्क झाला असल्याचे यावेळी नमूद केले

मंठा परतूर नेर शेवली भागात प्रचंड पाऊस पडल्यामुळे रात्रीपासून मी स्वतः अनेक कार्यकर्त्यांशी चर्चा केली त्यासोबतच जिल्हाधिकारी उपविभागीय अधिकारी जिल्हा कृषी अधीक्षक उपाध्यक्ष जिल्हा पोलीस प्रमुख तहसीलदार गटविकास अधिकारी यांच्यामार्फत यंत्रणा गावागावात पाठवल्या असून जिथे कुठे धोका अधिकारी त्या त्या ठिकाणी या सर्व यंत्रणा रात्रीपासूनच कार्यरत झाले असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी नमूद केले

पुढे माजी मंत्री आमदार बबनराव लोणीकर मनाली की, उद्भवलेल्या परिस्थितीने नुकसानग्रस्तांनी खचून न जाता खंबीर तिने सामना करावा यासाठी आपण व प्रशासन आपल्या पाठीशी खंबीर असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले

यावेळी उपविभागीय अधिकारी श्री गायकवाड तहसीलदार श्रीमती जोंधळे, पंजाबराव बोराडे विठ्ठलराव काळे, विलास घोडके कैलास चव्हाण, प्रसाद बोराडे दीपक बोराडे, माऊली गोंडगे, मुस्तफा पठाण, मनोज देशमुख, तानाजी शेंडगे मदन बोराडे मधुकर काळे अच्युत बोराडे नैनाजी काळे रोहिदास बोराडे अशोक बोराडे विष्णू बोराडे संदीप बोराडे उद्धवराव बोराडे नेनाजी काळे जानकीराम चव्हाण ज्ञानदेव बोराडे रामा बाजार कुलकर्णी वसंत घुटे, उमेश काळे यांच्या सह नुकसानग्रस्तांची उपस्थिती होती.

### जिल्ह्यातील नागरिकांनी...

आन्वा ८९.५ मि.मी , हसनाबाद ९२.८ मि.मी , जाफ्राबाद तालुका- माहोरा ७३.३ मि.मी, परतूर तालुका- आष्टी १२७.८ मि.मी , सातोना १३४.३ मि.मी , मंठा तालुका- तळणी १०७ मि.मी , ढोकसाळ १३०.५ मि.मी , पांगरी १२०.३ मि.मी अंबड तालुका- अंबड १९४.८ मि.मी , धनगर पिंपरी १५१ मि.मी , जामखेड १७५.८ मि.मी , रोहीलागड १५८ मि.मी , गोंदी १३१.५ मि.मी , वडीगोद्री २२७.८ मि.मी, सुखापूरी २३३.८, घनसावंगी तालुका- घनसावंगी २८०.८ मि.मी., राणी उंचेगाव २५१.८ मि.मी., तिर्थपूरी २६९ मि.मी., कुंभार पिंपळगांव २५९.३, मि.मी., अंतरवाली १०७ मि.मी., रांजणी ९२.८ मि.मी., आणि जांबसमर्थ १६७.३ मि.मी. अशी पावसाची आकडेवारी आहे.

जिल्हा प्रशासन सतर्क असून सर्व यंत्रणा क्षमतेने मदत आणि बचाव कार्यात कार्यरत आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

### जाफराबादच्या पूर्णा...

असून पूर्णा नदीच्या आजूबाजूच्या शेतकऱ्यांना त्याचा फायदा होत आहे. आजूबाजूच्या प्रदेश भोकरदन तालुक्याच्या प्रदेशांमध्ये दोन दिवसापासून पाण्याची रिपीट सुरू असताना आहे. त्यामुळे पूर्णा नदीला पूर आलेला आहे. भोकरदन जाफराबाद तालुक्याचे माजी आमदार चंद्रकांत दानवे यांना यांनी जनतेला आव्हान केले आहे की सध्या जालना जिल्ह्यातील पावसाचा रेड अलर्ट जारी करण्यात आलेला असून नदीकाठच्या लोकांनी, गावकऱ्यांनी आणि शेतकऱ्यांनी, आपली जनावरे तसेच आपण सुद्धा काळजी घेऊन वागावे असे आव्हान करण्यात आले आहे. तसेच शासनातर्फे सुद्धा हवामान खात्यातर्फे सुद्धा सतर्कतेच्या आवाहन करण्यात आलेले आहे

नागरिकांनी याची काळजी घ्यावी. पूर्णा नदीला पूर आल्यामुळे पूर्ण काटच्या परिसरातील शेतकरी आनंदी झाले असून. भविष्यात पाण्याचा प्रश्न सुटू शकतो अशी आशा आता निमर्णि झाली आहे. इतर ठिकाणी भरपूर पाऊस पडत असताना जाफराबाद तालुक्यात पाऊस पडत नव्हता परंतु दोन-तीन दिवसापासून पाऊस आता सुरू झालेला आहे. प्रशासना तर्फे सुद्धा सतर्कतेचे आव्हान करण्यात आले आहे. पोळा सणाला पाऊस पडल्यास शेतकऱ्यांना आनंद होत असतो तसा यावर्षी आनंद झालेला आहे.

### परतूर तालुक्यात...

शिरल्याने आत मध्ये पाच फूट एवढे पाणी साचले होते. यामध्ये नुकसान किती झाल्याचं स्पष्ट झालं नाही. यावर खबरदारी म्हणून नगरपरिषद ची टीम रात्री त्या ठिकाणी बचाव कार्यासाठी सज्ज होती. निम्न दुधना नदी पहिल्यांदाच फुल भरली आहे. गेल्या २४ तासाने पाऊस सुरू असल्यामुळे पाणी वाढले होते. निम्मा दूधनेचा पाणीसाठा ३१, सप्टेंबर रोजी पाणी पातळी २८% एवढी होती. दोन सप्टेंबरला सकाळी ८ वाजता पाणी पातळी ६६.५१% वर पोहोचली होती. पाण्याची आवक ५४ हजार ३२६, क्युसेक मागील दोन तासात पाणी वाढ होत असल्याने दुधना नदीतून पाणीसाठा ७५% टक्के एवढा पाणीसाठा ठेवता येते. म्हणून धरण व्यवस्थापन नदीपात्रात पाणी सोडण्याची तयारी करीत आहेत. निम्म दुधना नदी जवळ असलेल्या जनतेला सावध राहण्याचा इशाराही दिला आहे.

### ग्रामीण भागात...

प्रयत्न करणार आहे. तसेच व्यवसाय कर रद्द करण्यासंबंधी सरकार दरबारी चेंबरकडून अनेकवेळा निवेदने देण्यात आली आहेत. तरी अद्याप सरकारने हा कर रद्द केलेला नाही. सरकारने हा कर रद्द केला नाही तर पुढील काळात व्यापारी वर्गाचा तीव्र आंदोलन उभारण्याचा निर्धार बैठकीत करण्यात आला. मराठवाड्यातील काही महानगरपालिका २४ तास जनतेस पाणी पुरवठा करत नाही. तरीही पूर्ण पाणीपट्टी वसूल करत आहे. याबद्दल बैठकीत चिंता व्यक्त करण्यात आली. त्याविषयी महानगरपालिकेच्या आयुक्तांना जाब विचारण्याची तयारी चेंबरने केली आहे. या बैठकीस महासचिव शामसुंदर लोया , कोषाध्यक्ष विकास सावजी, वरिष्ठ उपाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी, उपाध्यक्ष लक्ष्मीकांत राठी, सूर्यकांत हाके, संजय मोदानी, सचिव संतोष कावळे पाटील, जफर मिर्झा, सहसचिव संजय दाड आदी उपस्थित होते.

### मनपा हद्दीमध्ये...

शहिद भगतसिंह यांच्या नावाने कुठेही मार्ग, पुतळा अथवा स्मारक उपलब्ध नाही. त्यामुळे येणाऱ्या पिढील शहिद भगतसिंह यांच्या कार्याची आठवण रहावी यासाठी शहरातील मनपा हद्दी मध्ये शहिद भगतसिंह स्मारक उभारण्यासाठी योग्य प्रयत्न करण्यात यावे. त्यासाठी येत्या २८ सप्टेंबर रोजीच्या शहिद भगसिंह जयंतीच्या पुर्वी जागा नियोजीत करुन, कायदेशीर व तांत्रिक बाबींची पुर्तता करुन स्मारक उभारणीचे काम पूर्ण करावे अशी मागणी निवेदनाच्या माध्यमातुन करण्यात आली आहे.

दिलेल्या निवेदनावर संतोषसिंह कलाणी, संदिपसिंह भागा, सतनामसिंह टाक, कलदिपसिंह कलाणी, जितुसिंह टाक, गुरमितसिंह कलाणी, मोनुसिंह कलाणी, कुंदनसिंह टाक, अभिजीतसिंह टाक, लक्कीसिंह ई. च्या स्वाक्षऱ्या आहेत.



युवा सेनाचे जालना उपजिल्हाप्रमुख योगेश गणगे यांनी आपल्या गावी हनवत खेडा येथे बैलपोळा सण साजरा केला.

# जालन्यातील गल्हाटी धरण ओव्हर फ्लो

## जवळपासच्या गावांचा पाणी प्रश्न मिटला; पाणी शेतात शिरल्याने पिकांचे नुकसान

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यातील अंबड तालुक्यातील शहापूर -बारसवाडा गल्हाटी मध्यम प्रकल्प १०० टक्के भरुन ओसंडून वाहू लागल्याने गल्हाटी नदीला पूर परिस्थिती निर्माण झाली आहे तर गल्हाटी नदी दुथडी भरुन वाहत आहे. हवामान विभागाने अंदाज दिल्या प्रमाणे १ सप्टेंबर सायंकाळपासुनच वरुण राजाचे आगमन झाले तर दिवसभर पावसाच्या सरी कोसळत होत्या.

तर रात्री रात्र भर पाऊस पडत असल्याने गल्हाटी प्रकल्प हा १००टक्क्यांनी भरुन सांडव्याद्वारे ओसांडून वाहु लागला. या गल्हाटी प्रकल्प भरल्यामुळे शहापूर,दाढेगाव,धाकलगाव, मंठतांडा,पिठोरी सिरसगाव, सोनक पिंपळगाव, या गावच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटला असुन परंतु शेतीचे नुकसान झाले आहे कापुस, सोयाबीन,मुग,बाजरी, मोसंबी, डाळिंब या पिकाचे शेतात पाणी साचल्याने मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे नुकसान झालेल्या पिकाचे तत्काळ पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना मदत करावी आसी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. घनसावंगी मतदार संघातील शेतकऱ्यांना लोकप्रतिनिधी आमदार राजेश टोपे यांनी सतर्कतेचा इशारा म्हणून कुठलाही प्रकारची जिवीत हानी होऊ नये यासाठी सतर्कतेचा व्हिडिओ पाठवला आहे. माजी मंत्री टोपे यांनी सांगितले की जालना जिल्ह्यातील अंबड, घनसावंगी, मंठा, परतुर या भागामध्ये अतिवृष्टी दृश्य आहे. अतिवृष्टीमुळे नदी काठच्या गावकऱ्यांनी सतर्क राहावे सतत पाऊस पडत असल्यामुळे नदी नाले ओसांडून वाहत आहेत. छोटे-मोठे प्रकल्प पूर्ण क्षमतेने भरले आहेत.नदी नाल्याला पाणी आले आहे.



शेतकऱ्यांने आपले बैल-गाय मुक्या जनावरांना सुरक्षित ठिकाणी बांधावे शेतकऱ्यांनी ही सतर्क राहावे जर पावसामुळे गावातील विजपुरवठा खंडीत झाला आसेल तर महावितरणने तत्काळ पाहणी करुन विजपुरवठा करावा जर पावसामुळे घराची पडझड झालेली आसेल तर सर्व स्तरावर गावातील घराची पडझड,शेतीचे नुकसान, मुक्या जनावरांचे नुकसान आदी ठिकाणी जाऊन पंचनामे करावेत असे आव्हान टोपे यांनी केले आहे.

# कमाल भाडे दरापेक्षा जास्त भाडे आकारणाऱ्या खाजगी प्रवासी बसच्या तक्रारीसाठी हेल्पलाईन

**जालना । प्रतिनिधी -** जिल्ह्यात व जालना शहरात खाजगी कंत्राटी प्रवासी बसची तपासणी व मनमानी भाडे आकारणीबाबत ३० सप्टेंबर २०२४ पर्यंत विशेष तपासणी मोहिम राबविण्यात येणार आहे. मोटार वाहन कायदा व त्याखालील तरतुदींचा भंग करणाऱ्या खाजगी बस धारकांविरुध्द कारवाई करण्यात येणार आहे. मनमानी भाडे आकारणाऱ्या कंत्राटी बस धारकांविरुध्द तक्रार करण्यासाठी जालना उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाकडून हेल्पलाईन क्रमांक ०२४८२ २२०४८० तसेच ई-मेल dyrto.21-mhgov.in कार्यान्वित करण्यात आला आहे. नागरिकांनी खाजगी कंत्राटी बस धारकांकडून प्रवासासाठी जादा भाडे आकारणी केल्यास तक्रार नोंदवावी, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी केले आहे.

# ईश्वर मानवतेच्या बाजूने जुलूम व अत्याचाराला अजिबात सहन करीत नाही- क़वी फ़लाही

## जमात ए इस्लामीचे एक दिवसीय प्रशिक्षण शिबीर जालना येथे संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** ईश्वर हा मानवतेच्या बाजूने जुलूम आणि अत्याचाराला अजिबात सहन करत नाही. असे प्रतिपादन जमात ए इस्लामी हिंद औरंगाबाद येथील मौलाना अब्दुल क़वी फ़लाही यांनी केले.

जमात ए इस्लामी हिंद चे सहामाही एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर काल रविवार दिनांक १ सप्टेंबर रोजी येथील सिटी लॉन्स मध्ये आयोजित करण्यात आले होते. याप्रसंगी क़वी फ़लाही आपल्या अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना फ़लाही म्हणाले की ईश्वराचे कार्य तुमच्या वाचून अडून राहणार नाही. तो तुमच्या ठिकाणी दुसऱ्या लोकांना मैदानात उतरवू शकतो आणि दुसऱ्या लोकांना संधी देऊ शकतो. तुमच्याकडून अशी अपेक्षा आहे की आहे त्या परिस्थितीत तुम्हाला उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीच्या बळावर मैदानात उतरावे लागेल. मनुष्याचे अपंगत्व किंवा त्याची विकलांगता व अडीअडचणी ईश्वराकडून टाकण्यात आलेल्या समाजप्रबोधनाच्या कार्यात अडसर ठरू शकत नाही. आज विशेष करून नव्या पिढीवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. कारण आज वाममार्गाकडे तरुण वर्ग झपाट्याने जात आहे. व्यसनाधीनता, जुगार आणि व्याभिचार मोठ्या प्रमाणावर बोकाळला आहे. असेही ते म्हणाले.



जालना, अंबड आणि बदनापूर या तिन्ही तालुक्यांना मिळून दोन सत्रात आयोजित करण्यात आलेल्या या एक दिवसीय प्रशिक्षण शिबीराच्या पहिल्या सत्राची सुरूवात सकाळी १०:०० वाजता मौलाना अब्दुल क़वी फ़लाही यांच्या पवित्र कुरआन प्रवचनाने झाली. त्यानंतर जमात ए इस्लामी हिंद जालना जिल्हाध्यक्ष सय्यद शाकिर यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाची रुपरेषा मांडली. त्यानंतर मौलाना बशीर अहेमद राही यांनी जमात ए इस्लामीचा परिचय आणि उद्देश काय यावर मार्गदर्शन केले. जमात ए इस्लामीशी माझे संबंध आणि याबाबतीत माझे पुढील धोरण या विषयावर अब्दुल कुद्दूस घनसावंगी, हाकिम पटेल अंबड, आस्मा बाजी जालना, नाज़नीन बाजी जालना यांनी आपापल्या प्रतिक्रिया मांडल्या. जमात ए इस्लामी हिंदच्या वतीने देश पातळीवर राबविण्यात येणारी आगामी मोहीम नैतिक मुल्यांचे संगोपन - वास्तविक स्वातंत्र्याची हमी या मोहिमेबद्दल जमात ए इस्लामी हिंद महिला शाखेच्या औरंगाबाद जिल्हाध्यक्ष शाहिस्ता परवीन यांनी सविस्तर माहिती दिली. देशातील सद्यस्थिती मध्ये समाज प्रबोधनाची दिशा आणि कार्यप्रणाली या विषयावर जमात ए इस्लामी हिंद राज्य सल्लागार समितीचे सदस्य शेख अब्दुल मुजिब यांनी आपले विचार मांडले.

त्यानंतर दुपारच्या भोजनानंतर ठिक २:३० वाजता सदर शिबीराच्या दुसऱ्या सत्राला सुरूवात झाली. यामध्ये मुस्लिम महिलांच्या सक्रियतेचा मार्ग या विषयावर जमात ए इस्लामी हिंद जालना महिला शाखेच्या अध्यक्ष अम्मारा फिरदौस यांनी सखोल मार्गदर्शन केले. त्यानंतर आमच्या कार्याची गति - वर्तमान काळात आणि भविष्यात या विषयावर एक चर्चासत्र घेण्यात आले. सदर चर्चासत्राचे नेतृत्व स्टुडंट्स इस्लामीक ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया जालना शहराध्यक्ष अथर नवीद यांनी केले. या चर्चासत्रात जमात ए इस्लामी हिंद जालना शहराध्यक्ष शेख इस्माईल, अंबड शहराध्यक्ष मौलाना सादेख मज़ाहिरी, बदनापूर शहराध्यक्ष मुख्तार खान, मुव्हमेंट फॉर पीस एन्ड जस्टिसचे जालना जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम, जालना महिला शाखेच्या शहराध्यक्ष अम्मारा फिरदौस तसेच अंबड महिला शाखेच्या खिज़र ज़मानी इत्यादींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राचे सुत्रसंचलन गाज़ी तारिक नदवी यांनी तर दुसऱ्या सत्राचे सुत्रसंचलन शेख युसूफ बदनापूर यांनी केले. यावेळी जालना, अंबड आणि बदनापूर तालुक्यातील जमात ए इस्लामी हिंदच्या कार्यकर्त्यांसोबतच युथ मुव्हमेंट ऑफ महाराष्ट्र, एस आय ओ, एम पी जे, जी आय ओ तसेच ए पी सी आर चे महिला व पुरुष कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

# बैल धुत असताना विद्यूत शॉक लागून तरुणाचा मृत्यू

## जालन्यातील धावेडी येथील घटना

**जालना । प्रतिनिधी -** पोळा सणा निमित्त गावालगत असलेल्या ओढ्यावर बैल धूत असताना विद्युत शॉक लागून एकाचा दुर्दैवी झाल्याची घटना आज दि. २ सोमवार रोजी सकळी ०२:०० वा. च्या सुमारास घडलीय. विठ्ठल देविदास जाधव असे मयत व्यक्तीचे नाव आहे.

विठ्ठल जाधव यांच्या पश्चात दोन मुले, पत्नी, आई, एक भाऊ दोन बहिणी असा परिवार आहे.

जालना तालुक्यातील धावेडी गावामध्ये राहणारे विठ्ठल जाधव हे बैल पोळा सणानिमित्त बैल धुण्यासाठी ते जवळच असलेल्या ओढ्यावर गेले होते. ओढ्यावरील पाण्यात विद्युत प्रवाह उतरला होता, त्या पाण्याचा स्पर्श झाल्याने विठ्ठल यांना शॉक लागला. त्यामुळे ते खाली पडले, परिसरातील नागरिकांनी त्यांना तात्काळ जालना येथील रुग्णालयामध्ये उपचारासाठी हलवले परंतु डॉक्टरांनी त्यास तपासून मृत घोषित केले. घटनेची माहिती मिळताच तालुका जालना पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी आणि कर्मचारी यांनी रुग्णालयात



भेट देऊन घटनेचा तपशील घेतला. दुपारी तीन वा.च्या सुमारास पोलिसांनी मृतदेह ताब्यात घेऊन विच्छेदनासाठी पाठविला आहे. पुढील तपास तालुका पोलीस करत आहेत. दरम्यान ऐन सणासुदीत जाधव परिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला असून या घटनेने परिसरात हळहळ व्यक्त केली जातेय.

ओम साई राम गणेश मित्र मंडळाची कार्यकारिणी जाहीर

# अध्यक्षपदी राजेश दहीवाळ तर सचिवपदी सुमित बोराडे



**मंठा । प्रतिनिधी -** शहरातील वार्ड क्र. १० येथे बालाजी गल्ली मध्ये ओम साई राम गणेश मंडळाची बैठक नुकतीच पार पडली. बैठकीत अध्यक्षस्थानी एकमताने राजेश दहीवाळ यांची तर सचिवपदी सुमित बोराडे यांची निवड करण्यात आली.या वर्षीचा उत्सव दरवर्षीप्रमाणे साजरा करण्याचे ठरले असून नवनिर्वाचित कार्यकारणी जाहीर करण्यात आली. तसेच गणेशोत्सवाच्या दहा दिवसात घेण्यात येणाऱ्या विविध कार्यक्रमांचे प्राथमिक नियोजन करण्यात आले. मंडळाच्या अध्यक्षपदी राजेश दहीवाळ, उपाध्यक्ष संकेत बोराडे, ऋषी बोराडे, सचिव-सुमित बोराडे, सोशल मीडिया अध्यक्ष हरिओम शहाणे, समाधान खोसे, कोषाध्यक्ष अशोक चिंचने, सदस्य- विकास बोराडे, राहुल दाहीवाळ, अनिल डहाळे,करण तौर ,पवन शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. यावेळी मंडळाचे ज्येष्ठ सदस्यांसह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. बैठकीत नवीन पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन करण्यात आले.



पोळा सणानिमित्त काळुंका माता मंदिरामध्ये मानाच्या बैलाची पूजा करताना संस्थांचे अध्यक्ष अरविंदराव चव्हाण, दिलीप पाऊलबुद्धे, गोपाळ कुंडलिकर, धरम इंगळे, भगवान मेहत्रे, गोरख खलसे, किशोर सवडे, बाळासाहेब शिंदे व इतर ( छायाचित्र - किरण खानापुरे)

मोसंबी उत्पादकांच्या नुकसान भरपाईसाठी आ. नारायण कुचे जिल्हाधिकाऱ्यांना भेटले

# तात्काळ पंचनामे करून उत्पादकांना दिलासा देण्याची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** सततचा पाऊस आणि खराब हवामानामुळे जालना जिल्ह्यातील मोसंबी फळबागांचे फळगळ होऊन मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. त्या अनुषंगाने तात्काळ पंचनामे करून मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी, अशी मागणी आ. नारायण कुचे यांनी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्णनाथ पांचाळ यांच्याकडे केली आहे.

आ. नारायण कुचे आणि जालना जिल्हा मोसंबी व फळे बागायतदार संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवार दि. २ ऑगस्ट रोजी डॉ. पांचाळ यांची भेट घेतली. यावेळी आ. कुचे आणि बागातदार संघाच्यावतीने त्यांना स्वतंत्र निवेदन देऊन,



मोसंबी भागांच्या फळगळमुळे झालेल्या नुकसानीची व्यथा मांडत झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून, त्याचा अहवाल शासनाकडे सादर करण्याची मागणी करण्यात आली आहे. यावेळी जिल्हा कृषी अधीक्षक श्री. कापसे, जालना जिल्हा मोसंबी उत्पादक संघाचे अध्यक्ष पांडुरंग डोंगरे, सचिव अतुल लड्डा , बदनापूर भाजपाचे तालुकाध्यक्ष भगवान मात्रे, सुधीर पवार उपस्थित होते.

जालना जिल्ह्यातील मोसंबी फळाला भौगोलिक मानांकन प्राप्त होऊन ६ वर्षे झाली आहेत.

जालना हे मोसंबीचे महत्त्वाचे केंद्र असून, बदनापुरात मोसंबी संशोधन केंद्रदेखील आहे. परंतु, मागील दोन वर्षांपासून मोसंबी गळ या समस्येकडे कोणत्याही शास्त्रज्ञांचे लक्ष गेलेले नाही, तसेच यावर कोणताही ठोस तोडगा निघालेला नाही. यामुळे मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांवर मोठे आर्थिक संकट ओढवले आहे. आजपर्यंत जालना जिल्ह्यातील केवळ १ हजार ३०० मोसंबी उत्पादक बागायतदारांनी भौगोलिक मानांकनाचा वापर केला आहे.

वास्तविक जिल्ह्यात अंदाजे २० हजार शेतकरी मोसंबीची लागवड करत असताना, आपला कृषि विभाग या मुद्याकडे दुर्लक्ष करत आहे, ही चिंताजनक बाब आहे. जोपर्यंत अधिकाधिक बागायतदार भौगोलिक मानांकनाचा वापर करणार नाहीत, तोपर्यंत जालन्यात २० हजार हेक्टर मोसंबी लागवड असल्याचे जगाला कसे कळणार?, असा प्रश्न यावेळी आ. कुचे आणि मोसंबी बागायतदार संघाने उपस्थित केला.

### जालना मोसंबीचे महत्त्व आणि संरक्षणासाठी प्रयत्न आवश्यक

जालन्यातील मोसंबी हे जिल्ह्याचे भूषण आहे. यासाठी जालना मोसंबीचे व्यापक मार्केटिंग होणे आवश्यक आहे. मोसंबीतील पौष्टिक गुणधर्मांमुळे दररोज सेवन करणे अत्यंत लाभदायक आहे. परंतु, शेतकऱ्यांना योग्य प्रकारे मदत मिळाली तरच या मोसंबी फळाचे उत्पादन व गुणवत्ता टिकवणे शक्य होईल. म्हणूनच मोसंबी बागायतींचे नुकसान भरून काढण्यासाठी आणि जालना मोसंबीचे संरक्षण करण्यासाठी प्रशासनाने आवश्यक पावले उचलावी, अशी मागणी उपस्थितांनी केली. संपूर्ण महामार्ग, रस्ते, विमानतळ, रेल्वे स्टेशन, बस स्टॅन्ड जिल्हा व तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयात मोसंबीचे गुणधर्म व फायद्याबद्दल होर्डिंग लागले गेले पाहीजे. दोन वर्षांपूर्वी भारतीय पोस्ट खात्याच्यावतीने प्रकाशित जालना मोसंबीचे विशेष आवरण असलेले लिफाफे प्रत्येक सरकारी कार्यालयातून वापरले जाणे गरजेचे असताना, तसे कुठेही दिसून येत नाही. याकडेही लक्ष द्यावे, अशी मागणी यावेळी अतुल लड्डा यांनी केली. मार्केटिंग केल्याशिवाय मोसंबीचा मोठ्या प्रमाणावर वापर होणार नाही, असे ते म्हणाले.

## शिवसेना महिला आघाडीच्या अध्यक्षा सुनिता देशमुख यांची नायगाव येथील क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमास भेट



**मंठा । प्रतिनिधी -** तालुक्यातील नायगाव येथे टी.बी मुक्त भारत अभियानांतर्गत मोफत एक्स-रे शिबिराचे आयोजन ग्राम पंचायत नायगाव व दहिफळ खंदारे आरोग्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. या कार्यक्रमाला शिवसेना महिला आघाडीच्या अध्यक्षा श्रीमती सुनिता देशमुख यांनी सदिच्छा भेट दिली.

यावेळी या कार्यक्रमाला भेट दिल्याबद्दल सुनिता ताई देशमुख यांचे मा.सरपंच अविनाश राठोड यांनी धन्यवाद मानले.

यावेळी नायगाव ग्राम पंचायत अंतर्गत केलेल्या विविध कामाची संपूर्ण माहिती त्यांनी मिळवली. ग्राम पंचायतीने विविध उत्कृष्ट काम केल्याबद्दल ग्रामपंचायतीच्या सरपंच, उपसरपंच , आणि सदस्य या त्यांनी अभिनंदन केले.

या टी.बी मुक्त अभियाना प्रसंगी त्यांनी आरोग्य सहाय्यक इकडे तसेच अनेक आरोग्य कर्मचारी यांच्याशी अभियान, औषधी आणि उपचाराविषयी माहिती मिळविली.

पुढे त्यांनी आपण सदैव सामाजिक उपक्रमामध्ये तुमच्या सदैव सोबत आहोत असा शब्द त्यांनी यावेळी दिला.

या अभिनव कार्यक्रम ाप्रसंगी सरपंच चंद्रकला सूर्यवंशी, उपसरपंच नामदेव फफाटे, ग्रामसेवक बाबासाहेब गवळी, राहुल सूर्यवंशी ,रघुनाथ कोकाटे लखन राठोड इतर गावकरी उपस्थित होते.

# युवासेनेचे संघटन मजबुत करा - भास्करराव अंबेकर

**जालना । प्रतिनिधी -** युवकांच्या प्रश्नांना वाचा फोडण्यासाठी त्यांना न्याय मिळून देण्यासाठी युवासेनेने प्रयत्न करावेत. आज युवकांसमोर बेरोजगारी, व्यसनाधिनता अशा अनेक समस्या उभ्या आहेत. युवा शक्तीला एकीकडे राष्ट्र शक्ती म्हटले जाते. परंतु त्यांच्या समस्यांकडे शासन सोयस्करपणे दुर्लक्ष करीत आहेत. त्यांच्या या समस्या सोडविण्यासाठी युवासैनिकांनी प्रयत्न करावेत त्यांना वाचा फोडण्यासाठी युवासेनेने संघटन मजबुत करावे, असे आवाहन शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे)जिल्हाप्रमुख भास्करराव अंबेकर यांनी केले.

जालना शहरातील शिवसेना भवनात विधान परिषदेचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे सुपुत्र ॲड. धर्मराज दानवे यांची जालना जिल्हा युवासेना राज्य विस्तारक पदावर नुकतीच नियुक्ती झाली. त्यानिमित्त आयोजित सत्कार कार्यक्रमप्रसंगी अंबेकर बोलत होते. यावेळी व्यासपीठावर माजी आमदार संतोष सांबरे, उपजिल्हाप्रमुख बाबुराव पवार, युवासेनेचे सचिव विनायक चोथे, विस्तारक भरत सांबरे, शहरप्रमुख बाला परदेशी, घनश्याम खाकीवाले, दुर्गेश काठोठीवाले, महिला आघाडीच्या जिल्हा संघटक मंगलताई मेटकर, माजी नगरसेविका गंगुताई वानखेडे, युवासेना शहर जिल्हाध्यक्ष राजु सलामपुरे, मंगेश गव्हाड, शहरप्रमुख अंकुश पाचफुले, अश्विन अंबेकर,युवासेना कार्यकारणी सदस्या अश्विनीताई पवार,उपसचिव मनीषाताई वाघमारे,सहसचिव पूजाताई खंदारे यांच्यासह युवासेना पदाधिकार्यांची उपस्थिती होती.

यावेळी पुढे बोलतांना अंबेकर म्हणाले की, जालना जिल्ह्यात युवासेना वाढीसाठी भरपुर चालना आहे. वार्डा-वार्डात युवकांनी पक्षप्रमुख उध्दव ठाकरे, युवासेना प्रमुख आदित्य ठाकरे यांच्या हात बळकट करण्यासाठी संघटन मजबुत करावे. तसेच विद्यार्थी, युवकांचे प्रश्न सोडविण्यासाठी व त्यांना वेळोवेळी मदतीसाठी तातपर राहावे, असे आवाहन केले. यावेळी सत्कारास उत्तर देतांना नवनियुक्त युवासेना राज्य विस्तारक धर्मराज दानवे म्हणाले की, आगामी काळात जालना जिल्ह्यातील युवासेनेचे संघटन हे राज्यात अव्वल कसे राहील यासाठी मी कसोशीने प्रयत्न करणार आहे. जिल्ह्यातील सर्वच पदाधिकार्यांना सोबत घेवून मजबुत बांधणी करण्यात येईल. या जिल्ह्यात शिवसेना (उध्दव बाळासाहेब ठाकरे) हा पक्ष अत्यंत मजबुत असल्याने या ठिकाणी युवासेनेची बांधणीही चांगली होईल, यात मला शंका वाटत नसल्याचे सांगून जालना जिल्हा युवासेनेच्या वतीने केलेल्या सत्काराबद्दल आभार व्यक्त करुन युवासैनिकांना कामाला लागण्याचे आवाहन केले. तर यावेळी माजी आमदार संतोष सांबरे यांनीही ॲड. धर्मराज दानवे यांना नियुक्तीबद्दल शुभेच्छा देत जालना जिल्ह्यात युवासेनेचे संघटन मजबुत करण्यासाठी आपण निश्चित प्रयत्न कराल परंतु पदाधिकार्यांनीही एकमेकांकडे बोट न दाखवता प्रत्येकांनी आपले काम चोख करुन जिल्ह्यात संघटन बांधणी चांगली करावी. तसेच सामान्य नागरिक व युवकांना ही संघटना आपलीशी वाटेल असे कार्य करावे, असे आवाहन केले. यावेळी युवासेना उपजिल्हाप्रमुख ऋषी खिरे, युवासेना तालुकाप्रमुख संदीप मगर, दिपक कदम, कुणाल खाकीवाले, जयेश सांबरे, तेजस कदम, श्रवण सांबरे, विशाल वाघमारे, राजेश शेळके यांच्यासह युवासैनिकांची उपस्थिती होती.








हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.